# गृहसजावट

## वास्तुशास्त्रीय दृष्टिकोन

बबनराव पाटील

**अंतर्गत सजावटीतील कलाकुसर, रंगसंगती, प्रतीके, पेंटिंग्ज, झाडे याद्वारे शोधलेल्या वास्तुगुणोत्कर्षाबरोबरच घर खऱ्या अर्थाने सजते ते घरातील माणसांमुळे. घराच्या घरपणामुळे. सुखाच्या, आनंदाच्या क्षणी तसेच दुःखाच्या, निराशेच्या प्रसंगी जवळ करणाऱ्या आपलेपणामुळे, भावनिक ओलाव्यामुळे.**


घरातील अंतर्गत सजावट ज्याचा 'इंटिरिअर डेकोरेशन' म्हणून सध्या चांगलाच बोलबाला आहे. ही कधी काळी घरातील व्यक्तींच्या कल्पकतेतून साकारणारी बाब होती. परंतु आजकाल मात्र या क्षेत्रातही तज्ज्ञांचा अर्थात इंटिरिअर डेकोरेटर्सचा सल्ला हमखास घेतला जातो. एखादा बंगला किंवा एखादा आलिशान फ्लॅट विकत घेतल्यावर त्या घरातील व्यक्तींच्या गरजा, आवडीनिवडी यांना अनुसरून कलात्मकरीत्या जागेचा पुरेपूर वापर करीत घरातील फर्निचरची रचना एवढेच नव्हे तर त्यांची मांडणी, पडदे, भिंती इत्यादी सर्वांची रंगसंगतीदेखील इंटिरिअर डेकोरेटर्सद्वारे होते.

मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये छोट्या 1BHK, 2BHK घरांमध्ये कमी जागेचा अधिकाधिक उपयोग करण्याकरिता छुपे रॅक्स, छुपे डायनिंग टेबल, कपाट आदींची योजना करण्याकरिता इंटिरिअर डेकोरेटर्सला पाचारण केले जाते. इंटिरिअर डेकोरेटर्सद्वारे मग घराला ट्रॅडिशनल टच, फॉरेन टच, मॉर्डन टच दिला जातो. फॉरेन टचमध्ये मग अमेरिकन स्टाइल, फ्रेन्च स्टाइल तर ट्रॅडिशनल टचमध्ये राजस्थानी शाही स्टाइल, दाक्षिणात्य स्टाइलने घर सजवले जाते.

घराची सजवणूक करतेवेळी एक गोष्ट कटाक्षाने लक्षात ठेवावी. ती म्हणजे घराची बांधणी, रचना ही नैसर्गिक परिस्थितीला अनुकूल असावी. घरामध्ये अत्याधिक सूर्यप्रकाश, मोकळा वारा रहावा अशी व्यवस्था असावी. घरामध्ये ओल, कोंदटपणा, किचनमध्ये धूर राहणार नाही याची विशेष काळजी घ्यावी. वास्तुशास्त्रकारांनीही हे घटक अनारोग्यास कारणीभूत ठरतात असे सांगितले आहे.

**श्रेयस-प्रेयस विचार**

घराच्या सजावटीमध्ये व्यक्तिगत आवडी-निवडींना निश्चितच स्थान आहे. परंतु एखादी वस्तू अथवा कल्पना ही केवळ आवडणारी (प्रिय), सुंदर कलात्मक आहे एवढाच निकष सजावटीसाठी न ठेवता ती किती श्रेयस्कर आहे याचाही विचार झालाच पाहिजे. केवळ आवड अथवा 'चांगलं दिसतं' म्हणून नव्हे तर 'चांगलं




उत्तर व पूर्व या ऊर्जेच्या उगम दिशा आहेत. उत्तरेकडून शुभ जैविक तर पूर्वेकडून शुभ प्राणिक ऊर्जेचा उगम होतो. या शुभलहरींमुळे वास्तुशुभत्व वाढते. दक्षिण व पश्चिम या ऊर्जेच्या अस्त दिशा आहेत. या दिशांतून येणारी किरणे अशुभ असतात. म्हणूनच उत्तर व पूर्व या शुभ दिशांचे संगम असणारी 'ईशान्य दिशा' सर्वाधिक धन ऊर्जेने युक्त आहे. तर दक्षिण व पश्चिम या अशुभ ऊर्जांचा संगम असणारा 'नैऋत्य' कोपरा हा सर्वाधिक ऋण ऊर्जेने भारित आहे.

पूर्वेकडून येणाऱ्या शुभकिरणांना दक्षिणेकडून येणाऱ्या ऋणभारित समान अंतरावरील किरणे जेथे छेदतात त्या कर्णरेषेपर्यंतच पूर्व दिशेचे प्रभावक्षेत्र तयार होत असते.

असाच प्रकार दक्षिण-पश्चिम, पश्चिम-उत्तर, उत्तर-पूर्व या दिशांसंदर्भात अभ्यासता येतो.

उ

प



पू

द

ज्या दिशेच्या प्रवाहांना वाहण्याकरिता अधिकाधिक क्षेत्र मिळते, तेवढे त्या दिशेचे प्राबल्य दिसून येते.

**दिशांशी संबंधित घटक**

पूर्व : प्रगती, सृजनशीलता, आरोग्य, बौद्धिक कार्य, उत्साह

पश्चिम : कोर्टकज्जे, भागीदारी, अन्न-वेळ-कष्ट-धन यांना वाया घालणारी दिशा

उत्तर : धनदायी, मनःस्वास्थ्य प्रदान करणारी दिशा


दक्षिण : संकटे, कलहाची दिशा

वरील पार्श्वभूमी समजून घेतल्यावर हे सहजच लक्षात येईल की पूर्व-उत्तर-ईशान्य हा दिशाप्रभाग जेवढा मोकळा, उतारावर राहील तेवढे शुभ ऊर्जाप्रवाहांमुळे वास्तूचे शुभत्व वाढते. दुसरीकडे दक्षिण, नैऋत्य, पश्चिम दिशा प्रभाग जेवढा बंद, जड व उंचावर तेवढे वास्तूचे अशुभ ऊर्जाप्रवाहांमुळे संरक्षण होईल.

**पंचमहाभूतांचे अष्ट दिशांशी असणारे नाते**

वायव्य उ ईशान्य

प




पू

नैऋत्य द आग्नेय

ईशान्य कोपरा - जलतत्त्वप्रधान
आग्नेय कोपरा - अग्नितत्त्वप्रधान
नैऋत्य कोपरा - पृथ्वीतत्त्वप्रधान
वायव्य कोपरा - वायुतत्त्वप्रधान
ब्रह्मस्थान - आकाशतत्त्वप्रधान

**भूमिप्लव (जमिनीचा उतार) व छपराचा उतार**

सध्या प्रशस्त ऐसपैस घरांमध्ये बैठकीची खोली, डायनिंग रुम, मुलांची स्टडीरुम व शयनकक्ष अशी खोल्यांची विभागणी भिंती न घालता जमिनीचा स्तर पायऱ्यांच्या आधारे उंचावून पार्टीशन साधण्याची स्टाइल येत आहे. अशा वेळी जमिनीचा प्लव (उतार) बिघडतो. जे योग्य नाही. असे जर करावेच लागले तर इंटिरिअर्सनी मात्र पूर्व, उत्तर, ईशान्य या दिशांची जमीन उतारावर तर दक्षिण, नैऋत्य, पश्चिम या दिशांची जमीन उंचावर येईल, अशी योजना करावी म्हणजे झाले! जमिनीच्या उताराप्रमाणे छताची दिशा ही पूर्व-उत्तर-ईशान्येस उतरती तर दक्षिण-नैऋत्य-पश्चिमेस चढती असावी याकडे कटाक्षाने लक्ष घालावे.

ईशान्य-पूर्व-उत्तरेकडे अधिकाधिक शुभत्व देणाऱ्या प्रवाहांकरिता या दिशेस खिडक्या संख्येने व आकारानेही जास्त असाव्यात तर याविरुद्ध दक्षिण-नैऋत्य-पश्चिमेस तुलनेने खिडक्या कमी तसेच आकारानेही बेताच्याच असणे बरे. मुंबईच्या समुद्रकिनारी असणाऱ्या अनेक फ्लॅट्समध्ये पश्चिम-दक्षिणेच्या खिडक्या या जमिनीलगत (floor touching-french windows) असून समुद्रकिनाऱ्याचे मनोरम दर्शन त्यातून होत असल्याने त्या जागांचे भावही जास्तच आहेत. पैसा खर्च करुन हे अशुभत्व विकत घेणे कितपत योग्य आहे ?

पूर्व-उत्तर-ईशान्य या ऊर्जेच्या उगम दिशांना जलतत्त्वाच्या आधिक्याप्रमाणेच येथील श्वेतरंग, मार्बलचा उपयोग, स्फटिक काच, चांदी, मोती, मोतिया रंग, अर्धचंद्राकृती आकार हे येथील तत्त्वास पूरक आहेत. स्फटिकाच्या झुंबरांकरिता ही सर्वोत्तम दिशा आहे.

ईशान्य-उत्तर प्रभागात अंडरग्राउण्ड टाकी असल्यास सोन्याहून पिवळे. हे शक्य नसेल तर पाण्याचा साठा, पाण्याने भरलेली कळशी (तांब्याची पूर्वेस, चांदीची उत्तरेस), कलशस्थापना, काचेचा गोलाकार फिशटँक, कृत्रिम धबधबा, कारंजे यांची योजना या दिशेस केल्यास वास्तुगुणोत्कर्ष घडेल यात शंकाच नाही.

उत्तर ईशान्येस जमिनीसाठी, भिंतीसाठी मार्बलचा प्रयोग, मार्बलमध्ये अर्धगोलाकार पायऱ्या, खिडक्यांचे कट्टे, दिवाणखान्यात मार्बलमध्ये (उत्तर) लाकडामध्ये (पूर्वेस) अर्धगोलाकार कमानी, उत्तर-पूर्व बंद असता काचेच्या विटांमधील बांधकाम, पांढऱ्या आयव्हरी रंगाचे पडदे, सोफासेट, कुशन कव्हर्स, त्यात गोल, अर्धचंद्राकार कलात्कमता साधून दिशेच्या शुभत्वात भर घालावी. उत्तर-ईशान्येस चांदी व मोती यांनी बनवलेले आर्टिकल (मुकुट, प्लेट) किंवा चांदी व मोत्यांनी सजवलेले छोटे हत्ती, घोडे सोंदर्यात भरच घालतील. उत्तर भिंतीवर कुबेराचा फोटो न विसरता लावावा. वरील सर्व घटकांचा सुयोग्य मेळ असणारे ‘श्रीयंत्र’ सर्व गुणांनी समृद्ध आहे.

वास्तूच्या पूर्वेस फेंगशुईमध्ये झाडांचे महत्त्व (वृक्षतत्त्व) सांगितले आहे. पूर्वेस लाकडाच्या वापराबरोबरच तांब्याचा वापर वास्तुशुभत्व घडवून आणतो. पूर्वेकडील आदित्य व दक्षिणेकडील पृथ्वीतत्त्वातील मंगळाच्या प्रबलतेमुळे या दोनही दिशांना तांब्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्तर-ईशान्येस जल, स्फटिक, काचा, आरसे, संगमरवर याद्वारे साधलेला गुणोत्कर्ष पूर्वेसही शक्य आहेच परंतु लाकूड व तांबे यांचा अधिक उपयोग करून कलात्मकता साधता येईल. पूर्वेस मार्बल व लाकडी फर्निचर तर उत्तरेस मार्बल व काचेचा वापर करून फर्निचर बनवणे सयुक्तिक आहे. परंतु हे फर्निचर वजनदार नसावे. हलके असावे हे वेगळे सांगणे नको. पूजाघरासही हाच नियम लागू होतो. (पूर्वेस लाकडी, उत्तरेस-ईशान्येस संगमरवरी).

पूर्व बंद असता तांबे, लाकूड, रवीचे माणिक, मंगळाचे पोवळे, दूर्वांकुर यातून साकारलेले गजवंदना गणरायाचे आर्टिकल बौद्धिक उत्कर्षाकरिता तर याच साहित्यातून साकारलेली सूर्यनारायणाची प्रतिमा आरोग्यसंपन्नतेसाठी साहाय्यभूत ठरेल. पूर्व दिशेस वडाचे महत्त्व असल्याने अंतर्गत सजावटीमध्ये वडाचे बोन्साय ठेवणे. शक्य झाल्यास तसे अवश्य करावे.

पूर्व व दक्षिण यांचे संगमस्थान म्हणजे ‘आग्नेय’. हे अग्नितत्त्वाचे स्थान. सुप्तरुपात अग्नीचे वास्तव्य येथे आहे. त्याच्या तेजाने व ओजाने घर उजळून निघते. हा प्रकट स्वरुपात येथे स्वयंपाकघरातील विस्तव अथवा तेवत ठेवलेल्या ज्योतीच्या रुपाने असावा. याचे अधिक प्रकट स्वरुप भवनास घातक आहे. त्यायोगे हिंसा, कलहादी घटना उद्भवू शकतात. म्हणून आग्नेयेस अत्याधिक लाल रंगसंगती टाळावी. कमी प्रमाणात लाल रंग असणारा रेड आग्रा पत्थर वापरात आणावा. लाल रंगाच्या फुलाचे

झाडही येथे वर्ज्य आहे. पांढरी व हिरवी रंगसंगती असणारी फरशी, टाइल्स, किचनचा ओटा अन्यथा हिरवेगार रोपटे याचा खचितच फायदा होतो. ज्योतीचा त्रिकोणाकार दर्शवणारी ($\Delta$) त्रिकोणी कलात्मकता ही दिशा गुणोत्कर्षी व सुंदर करेल.

मंगळाचा प्रकर्ष असणाऱ्या दक्षिणेस ऊर्जेचा श्रेष्ठ संवाहक व रवी मंगळाच्या गुणांच्या ताम्रधातुप्रयोगामुळे ऊर्जाप्रवाहांचे संतुलन साधले जाते. येथील कलात्मक 'भौमयंत्र' दक्षिण भिंतीवर तर तांब्यातील शोभायमान पात्रांचा वापर सजावटीकरिता करता येतो.

पिवळ्या जैसलमेरमध्ये बसवलेली लादी, घरातील खिडक्यांना वापरलेल्या पिवळ्या काचा, पिवळा प्रकाश, पिवळी मॅट रंगसंगती यामुळे पृथ्वीतत्त्वाचे आविष्करण होऊन ऋण ऊर्जांचे विसर्जन होते. औदुंबराचे बोन्साय, ख्रिसमस ट्री यांच्यामुळेही येथे पृथ्वीतत्त्वाची मात्रा वाढते.

सर्वाधिक ऋण ऊर्जेने भारित असणाऱ्या नैऋत्येस अत्याधिक जडत्व प्रदान करण्याकरिता वजनदार वस्तूंची कलात्मकरीत्या मांडणी करावी. पिवळा जैसलमेर, पिवळ्या काचांबरोबरच दगडात, पाषाणात घडवलेली शिल्पे, दगडातील हत्ती, डोंगराचे, पर्वतराईचे पेंटिंग याचा वापर करावा.

पश्चिम दिशेस शनी प्रबळ असल्याने येथे शनितारका यंत्र वापरावे. पिंपळाचे बोन्साय पश्चिमेस शुभदायी सांगितले आहे. या दिशेपासून पुढे वायुतत्त्वप्रधान वायव्येकडे वाटचाल करताना ध्वनी, नाद, गंध यांचे आविष्करण उदबत्ती, फुले, घंटा, पवनसंवादिकज्ञा (Wind Chymes) यांच्या माध्यमातून करावे. निळ्या रंगाचा वापर, नीलहंडी, नीलस्फटीक, प्रकाश, पडदे, भिंती, लाद्या, टाइल्स, खिडक्यांच्या काचा, फर्निचर यांसाठी करून वायुतत्त्वाचा श्रेष्ठ संस्कार या दिशेवर होऊ शकतो. सिल्व्हर कलर तसेच प्रत्यक्ष चांदीचा वापरही उत्तर, ईशान्येप्रमाणेच प्रभावशाली आहे.

दिशानुरूप सजावटीप्रमाणे वास्तूतील विविध विभागांमध्येही वास्तुशास्त्रीय नियमांनुसार सजावट करणे सहज शक्य आहे.

१) **बैठकीची खोली :**

ही खोली जास्तीत जास्त शोभिवंत करण्याकडे आपला कल असतो. जरा सावध... शोपिसेस आणि फर्निचर यांच्या अतिरेकाने बैठक खोलीतील वावर गुंतागुंतीचा तर होत नाही ना ?

बैठक खोली सुटसुटीत तसेच चौकोनाकृती असावी. 'L' आकाराच्या खोलीचे काचेच्या विटा किंवा प्लायच्या साहाय्याने विभाजन करावे. बैठकीत बीमखाली आसन येणार नाही, बसताना दरवाजाकडे बसणाऱ्याची पाठ येणार नाही या अनुषंगाने बैठकव्यवस्था करावी. बसताना मागे भिंत असणे सर्वोत्तम. खिडकी आल्यास मात्र पडद्यांची योजना करावी.

टीव्हीवर आच्छादन असावे. आरसा दक्षिण-पश्चिम भिंतीवर तसेच दरवाजा व जिन्यासमोर नसावा.

बैठकीची रंगसंगती मागे वर्णन केल्याप्रमाणे दिशानुरूप असावी. बैठकीत मनाला शांत, प्रसन्न व उत्साहवर्धक पेंटिंग्ज असावीत. आत्मविश्वास घालवणारी, निराश करणारी, मनात कालवाकालव निर्माण करणारी, नैसर्गिक आपत्तीदर्शक (पूर, वादळ, आग, ज्वालामुखी इत्यादी) युद्धादी प्रसंग तसेच अश्लीलतादर्शक पेंटिंग्जना जागा देऊ नये.

बैठकीत तलवार, कट्यार, बंदुका आदी शास्त्रास्त्रे तसेच प्राण्यांची शिंगे, नखे, दात, कातडी, मुंडके आदी असू नये.

पानाफुलांनी सजवलेल्या फुलदाण्या, कुंड्या असाव्यात पण शुष्क पुष्पपत्र वेळीच काढण्यास विसरू नये. नृत्य, गायनाची पार्श्वभूमी असल्यास वीणा, सतार आदी वाद्ये, नटराजाची मूर्ती अवश्य असावी. यामुळे वातावरणनिर्मिती होईल. दक्षिण भिंतीवर नावलौकिक प्रदान करणारी पदके, ट्रॉफीज, प्रमाणपत्रे अवश्य लावावीत.

२) **स्वयंपाकघर :**

घरातील सर्वात ॲक्टीव्ह वास्तुप्रभाग म्हणजे किचन. घराचा अर्धा संसार हा या प्रभागात थाटलेला असतो. येथे अन्न शिजवण्याबरोबरच घरातील गृहिणीचा अत्याधिक वावर तसेच अन्नधान्याचा साठा केला जातो.

स्वयंपाकघराच्या सजावटीपेक्षाही त्याची मांडणी महत्त्वाची असून इंटिरिअर्ससाठी आव्हानात्मक आहे.

स्वयंपाकघराचा ओटा अशा प्रकारे असावा जेणेकरून गृहिणीचे तोंड शुभ दिशेला येईल. किचनमध्ये हमखास आढळणारा प्रकार म्हणजे शेगडी व पाण्याचा साठा हा जवळ जवळ असणे. या दोन विरोधी तत्त्वांची विभागणी त्या तत्त्वांमध्ये कुंडीतील रोपटे, मनीप्लँट ठेवून साधावी. तसेच आग्नेयच्या किचनमध्ये ओट्याजवळील खिडकीतही हिरव्या रोपट्याच्या कुंड्या ठेवून शुभत्व आणावे. शेगडीजवळील पाण्याच्या साठ्याबरोबरच, फ्रिजवरील ओव्हनसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू वादविवादास कारणीभूत ठरतात.

स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यावर तुळई, माळा आला तर ते आरोग्यास अपायकारक असून त्यास False ceiling ने झाकावे. दरवाजासमोरच खिडकी आल्यास ऊर्जाप्रवाह निघून जात असल्याने खिडकीत कुंडी, पवन निनादिका तसेच शोभिवंत

पात्रांचा वापर करून प्रवाह अडून घरात प्रवाहित होतो.

अन्नपूर्णादेवीची टाइल्स किचनच्या भिंतीवर लावल्यास स्वयंपाक करताना गृहिणीचे मन प्रसन्न राहण्यास आपसूकच मदत होईल.

**३) डायनिंगरुम / भोजनगृह**

स्वयंपाकघराइतकेच महत्त्व भोजनगृहास आहे. कारण येथे कुटुंबातील सदस्य एकत्र बसून जेवण घेतात, भावनिक देवाणघेवाणही होते. मुळातच अन्नास पूर्णब्रह्म मानून जेवण हे केवळ उदरभरणच नाही असे आपण मानतो. आनंदी प्रसन्न मनोवस्थेत अन्नाचे पचनही योग्य प्रकारे होते. म्हणूनच घराच्या या कक्षास फार महत्त्व आहे.

भोजनकक्ष सुटसुटीत, उजळ, उत्तम प्रकाशव्यवस्था असणारे असावे. डायनिंग टेबल गोलाकार कोपरे असणारे असावे. याची व्यवस्था सामान्यतः रुमच्या मध्यात असावी, किमान जेवताना पाठी भिंत येईल अशी असावी. दरवाजाकडे पाठ येणे टाळावे. बीम, तुळईखाली जेवणास बसणे अनारोग्यकारक आहे.

भोजनकक्षात भिंतीवर आरसा लावल्यास अन्न दुप्पट असल्याचा भास निर्माण होणारा भास शुभ आहे. विविध हिरवीगार निसर्गचित्रे, भाज्या, फळफळावळ यांची पेंटिंग्ज भोजनकक्षात जरूर लावावीत.

**४) बेडरुम (मास्टर बेडरुम)**

शयनकक्ष हे दाम्पत्याच्या झोपेचे आणि विश्रांतीचेच नव्हे तर मनोमीलनाचे स्थान आहे. येथे ऑफिस कॉम्प्युटर, टी.व्ही. स स्थान देऊ नये. मंद प्रकाशव्यवस्था शयनकक्षाच्या वातावरणास पूरक आहे.

शयनकक्षाच्या दरवाजासमोर पलंग असू नये. झोपतेवळी डोके दक्षिणेकडे किंवा पूर्वेकडे असावे. तसेच डोक्याच्या मागे भिंत आल्यास उत्तमच. अशी भिंत आधार देणारी असते. बिम अथवा तुळईखाली पलंग येणार नाही याची काळजी घ्यावी. बीम हलवणे शक्य नसल्यास False ceiling करावी.

बेडरुममधील आरशाबाबत विशेष नियम पाळावेत. पलंगावर झोपल्यानंतर शरीराचा कोणताही भाग आरशात दिसता कामा नये.

पती-पत्नीच्या शयनकक्षात रोपट्याच्या कुंड्या असू नयेत. प्रेमाची प्रतीके असाणारी पेंटिंग्ज शयनगृहात असावीत जसे राधाकृष्ण शृंगार, शृंगारात रममाण पक्षीयुगुल, फुलदाणीतील पुष्पद्वय इत्यादी मात्र युद्धप्रसंग, एकमेकांवर धावून जाणारी जनावरे इत्यादी चित्रे लावणे कटाक्षाने टाळावे.

**५) मुलांचे शयनकक्ष :**

मुलांच्या शयनकक्षातच त्याची स्टडीरुमही असते म्हणून शांत झोपेबरोबरच एकाग्रता, स्मृती, बुद्धी यांची वाढही अपेक्षित आहे. चांगले आरोग्य, उत्तम बुद्धिमत्ता याकरिता पूर्व दिशेची निवड सर्वोत्तम आहे. या दिशेतील लाकडौ फर्निचर येथील वृक्षतत्त्वास अनुकूल वाढ करते. मागे वर्णन केल्याप्रमाणे पलंगामागील भिंत आधाराचे काम करते तशीच पलंगाची रचना करावी. संगणक आच्छादित असावा तर टी.व्ही. असूच नये. झोपताना पलंगावर तसेच अभ्यास करताना डोक्यावर बीम असू नये.

या कक्षात सरस्वतीदेवता, प्रेरणादायी पेंटिंग्ज, स्वामी विवेकानंद, सावरकर, बाळ गंगाधर टिळक अशा थोर नेत्यांची पेंटिंग्ज असावीत.

पूर्व-आग्नेयच्या बेडरुममध्ये मुलांच्या व्यायामाकरिता सायकल, डम्बेल्स, दोरीच्या उड्या किंवा तत्सम उपकरेणे ठेवल्यास ही थाटलेली छोटी व्यायामशाळा शंभर टक्के वापरात येऊन त्याद्वारे बालोपासना करणेही तरुण रक्ताला फायदेशीरच आहे.

**६) बाथरुम व शौचालय :**

उत्तम स्वच्छता, दुर्गंधविरहित, उत्तम प्रकाशव्यवस्था, हवेशीरपणा बाथरुम व शौचालयात असावा. बाथरुममधील नळ हे गळणारे असू नयेत तसे असल्यास त्याची त्वरित डागडुजी करावी. घरातील नळातून होणारी पाण्याची गळती अनाठायी खर्चास कारणीभूत ठरते.

सजावट प्रवेशद्वाराची

प्रवेशद्वार अर्थात मुख्य दरवाजा म्हणजेच घराचा चेहरा. व्यक्ती आपली शरीरयष्टी, पोषाख, व्यक्तिमत्त्व याबरोबरच आपल्या चेहऱ्याबद्दल विशेष जागरूक असतो किंबहुना सौंदर्याचा संबंध बऱ्याचदा चेहऱ्याशी जोडला जातो. घराच्या अंतरंगाच्या सजावटीप्रमाणेच घराचा चेहरा असलेल्या प्रवेशद्वाराच्या सौंदर्यासही प्राधान्य दिले जाते. किंबहुना मंगलप्रसंगी व्यक्ती आपल्या चेहऱ्याचे सौंदर्य जसे खुलवितो तसेच प्रवेशद्वारासही सजवण्याचा प्रघात पुरातन काळापासून चालू आहे.

वास्तुशास्त्रात घराच्या मुख्य दरवाजाला खूप महत्त्व दिले आहे. घराचा मुख्य दरवाजा हा शक्यतो २ कवाडांचा असावा व आतमध्ये उघडावा. दरवाजाच्या बाहेरील सेफ्टीडोअर हे बाहेर उघडणारे असावे. सेफ्टीडोअर अधिकाधिक सजवण्यापेक्षा मुख्य दरवाजाच जास्त सजवावा. दिशांनुरुप दरवाजांची रंगसंगती तसेच त्यावरील नक्षीकामांचे आकार (पूर्व - अर्धचंद्राकार, पश्चिम - चौकोनी, उत्तर - गोलाकार, दक्षिण - नैऋत्य : पिवळा जैसलमेर, पश्चिम-वायव्य-निळा : सिल्हर कलर).

दरवाजाबाहेरील खोबणीत मंगलकलशाची स्थापना करावी. अनेक मंगलचिन्हांनी दरवाजा सजवावा. दारास मंगलतोरण लावावे. दारासमोर शंख, स्वस्तिक, गोपद्म, आदी शुभचिन्हांकीत रांगोळ्या घालाव्यात. दारासमोर मंगलसमयी रांगोळी अवश्य घालावी. यामुळे वातावरण शांत व प्रसन्न राहण्याबरोबरच मंगलमयही होते.

अंतर्गत सजावट मग ती इंटीरीअर डेकोरेटरच्या सहाय्याने केलेली असो अगर आपण आपल्या कल्पकतेने खालील काही महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधावेसे वाटते.

१) घरातील दरवाजा-खिडक्यांची बिजागरे, कड्या यातून येणारा आवाज ऋण ऊर्जा निर्माण करतो या करिता वरचेवर वंगणाचा प्रयोग करावा.

२) घरातील गळके नळ त्वरीत दुरुस्त करावेत.

३) महत्त्वाच्या कामाला जाण्यापूर्वी घराचा मुख्य दरवाजा स्वतः पुसा. कामात नक्की यश येईल.

घरातील स्वच्छता हीच खरी लक्ष्मी असून त्याकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच घरातील अडगळ, अनावश्यक वस्तू या ऋणऊर्जा नर्माण करतात. ऊर्जा प्रवाहांना अडथळा निर्माण करतात म्हणून स्वच्छता राखण्याबरोबरच घरातील अडगळही दूर करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

सरतेशेवटी अंतर्गत सजावटीतील कलाकुसर, रंगसंगती, प्रतीके, पेटिंग्ज, झाडे यांद्वारे साधलेल्या वास्तुगुणोत्कर्षाबरोबरच घर खऱ्या अर्थाने सजते ते घरातील माणसांमुळे, घराच्या घरपणामुळे, सुखाच्या-आनंदाच्या क्षणी तसेच दुःखाच्या, निराशेच्या प्रसंगी जवळ करणाऱ्या आपलेपणामुळे, भावनिक ओलाव्यामुळे.

बबनराव पाटील (वास्तुमार्गदर्शक)
१, वैष्णव निवास, आकुर्ली क्रॉस रोड क्र. २,
कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.
फोन : ०९८२१३१८५५२ / २८८५२१०८